## आतापर्यंत ७० टक्के काम पूर्ण; सातपैकी सहा टप्प्यांतील भुयारीकरण १०० टक्के पूर्ण

# ‘मेट्रो ३’ प्रकल्पाच्या कामांना वेग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गाचे काम वेगात सुरू असून आतापर्यंत प्रकल्पाचे एकूण ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाचे ९७ टक्के आणि बांधकाम ७० टक्के पूर्ण झाले आहे. सातपैकी सहा टप्प्यांतील भुयारीकरणाचे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे. तर २६ मेट्रो स्थानकांपैकी आठ मेट्रो स्थानकाचे ८० टक्के, तर १३ मेट्रो स्थानकाचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) ३३.५ किमी लांबीच्या भुयारी मेट्रो ३ मार्गाचे काम सुरू आहे. हे काम सात टप्प्यांत करण्यात येत असून ५५ किमी लांबीचे भुयारीकरण केले जात आहे. यासाठी अत्याधुनिक अशा टीबीएम यंत्राचा वापर केला (पान ४ वर)

### पण कारशेड अधांतरीच

मेट्रो ३च्या कामाने वेग घेतला असून लवकरच सर्व काम पूर्ण होईल. पुढच्या वर्षी मेट्रो ३च्या चाचणीलाही सुरुवात होईल. पण मेट्रो ३ कधी धावेल हा प्रश्न मात्र आजही अनुत्तरित आहे. मेट्रो ३ च्या कारशेडचा तिढा अद्याप सुटलेला नाही, तर हा तिढा कधी सुटणार याचे उत्तर अजूनही कुणाकडे नाही. मेट्रो प्रकल्पातील कारशेड हा सर्वात महत्त्वाचा घटक. कारशेड नसेल तर मेट्रो कार्यान्वित होऊच शकत नाही. त्यामुळे मेट्रो ३ चा कारशेडचा तिढा सुटला तरच प्रकल्प पूर्णत्वास जाणार आहे. कारशेडबाबत एमएमआरसीकडे विचारणा केली असता त्यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया उपलब्ध होऊ शकली नाही.

### सात टप्प्यांचे काम

■ पहिला टप्पा : १०० टक्के काम पूर्ण ( कफ परेड, विधान भवन ८४, चर्चगेट ८१, हुतात्मा चौक)

■ दुसरा टप्पा : १०० टक्के काम पूर्ण (सीएसएटी, काळबादेवी ३०, गिरगाव)

■ तिसरा टप्पा : ७९ टक्के काम पूर्ण (मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, ए ए चौक, वरळी

■ चौथा टप्पा : १०० टक्के काम पूर्ण (सिद्धिविनायक, दादर, शितळादेवी)

■ पाचवा टप्पा : १०० टक्के काम पूर्ण (शितळादेवी, धारावी, बीकेसी, विद्यानगरी, सांताक्रूझ)

■ सहावा टप्पा : १०० टक्के पूर्ण (सीएसआयए (डी), सहार रोड, सीएसआयए)

■ सातवा टप्पा : १०० टक्के काम पूर्ण (मरोळनाका, एमआयडीसी, सीप्झ ८३)



## ‘मेट्रो ३’ प्रकल्पाच्या कामाला वेग

**(पान १ वरून)** जात आहे. सप्टेंबर २०१७ मध्ये भुयारीकरणाला सुरुवात करण्यात आली. आजघडीला भुयारीकरणाचे ९७ टक्के काम पूर्ण झाले आहे. एमएमआरसीने दिलेल्या माहितीनुसार मेट्रो ३ च्या कामाने आता वेग घेतला असून आतापर्यंत ९७ टक्के भुयारीकरण तर ७० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाच्या ७ टप्प्यांपैकी ६ टप्प्यांतील काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. केवळ टप्पा ३ मधील भुयारीकरणाचे २१ टक्के काम शिल्लक आहे. या टप्प्याचे ७९ टक्के काम पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाचे ९७ टक्के अर्थात ५३ किमी लांबीचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. ३३.५ किमी लांबीच्या मार्गावर २६ मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. मेट्रो स्थानकाच्या कामानेही गती घेतली असून २६ पैकी आठ मेट्रो स्थानकाचे ८० टक्क्यांहून अधिक, तर १३ मेट्रो स्थानकाचे ७९ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले आहे. गिरगाव आणि काळबादेवी मेट्रो स्थानकाचे बहुतांश काम अपूर्ण आहे. गिरगावचे केवळ २९ टक्के, तर काळबादेवीचे केवळ ३० टक्के काम पूर्ण झाले आहे.